14 SEP 2023
तरूण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# घरगुती रसायन निर्मितीमधून विद्यार्थ्यांत व्यावसायिक वृध्दी

## साबण, डिटर्जंट पावडर, फ्लोअर क्लिनर आदी वस्तू बनवण्याची शिकवली प्रात्यक्षिके

प्रतिनिधी
कोल्हापूर

दैनंदिन घरगुती वापरासाठी आवश्यक वस्तू वा पदार्थ विकत घ्यावे लागतात. त्यांची निर्मिती कमी खर्चात करता यावी. यासाठी विद्यापीठातील रसायनशास्त्र कार्यशाळेचे आयोजन केले होते. प्रयोगशाळेमध्ये डिटर्जंट पावडर व साबण, हँडवॉश, फिनाईल यांची निर्मिती करण्याचे प्रशिक्षण दिले. यातून विद्यार्थ्यांमध्ये व्यवसायवृध्दी वाढली आहे.

शिवाजी विद्यापीठाचा मध्यवर्ती रोजगार कक्ष आणि रसायनशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने घरगुती रसायने तयार करण्याची एकदिवसीय कार्यशाळा पार पडली. कार्यशाळेत रसायनशास्त्राचे पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या १२० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयातील डॉ. किशोर गायकवाड यांनी घरगुती रसायनांचे उत्पादन कसे करावे, याविषयी प्रशिक्षण दिले. यामध्ये फ्लोअर क्लिनर्स, द्रव साबण, कपडे धुण्याचा साबण, डिटर्जंट पावडर आदी रसायनांचे उत्पादनांची प्रात्यक्षिके दाखवली. एमबीए अधिविभागाचे संचालक डॉ. आण्णासाहेब गुरव यांनी व्यवसाय सुरू करण्याच्या मूलभूत गोष्टींबद्दल माहिती दिली. व्यवसाय योजना, व्यवसाय वित्तपुरवठा आणि व्यवसाय व्यवस्थापन आदी बाबींचे मार्गदर्शन केले. जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी मूलभूत आणि उपयोजित संशोधन यांचे वेगळेपण आणि महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांत उद्योजकीय दृष्टीकोन निर्माण होण्यास मदत झाली असून स्वतःच्या पायावर उभे राहण्याची प्रेरणा त्यांच्या मनात जागृत झाली आहे, असे मत रसायनशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. कैलास सोनवणे यांनी व्यक्त केले. यावेळी डॉ. गजानन राशीनकर, डॉ राजन पडवळ, प्रमोद समुद्रे, प्रदीप पाटील, क्रांतिवीर मोरे, अर्जुन कोकरे, साजिद मुलाणीआदी उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र अधिविभागातील आयोजित घरगुती रसायन निर्मिती कार्यशाळेअंतर्गत तयार केलेल्या रसायनांसह सहभागी विद्यार्थी–विद्यार्थिनी आणि मार्गदर्शक.

लोकमत

# ‘कथ्थक आदी कथ्थक’चे उद्या स्क्रीनिंग

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन आणि संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग यांच्यातर्फे शुक्रवारी पुणे येथील रेवा रावत दिग्दर्शित ‘कथ्थक आदी कथ्थक’ या डॉक्युमेंट्रीचे स्क्रीनिंग होणार आहे. नाट्यशास्त्र विभागातील हॉलमध्ये दुपारी २ वाजता हा कार्यक्रम होईल. ही डॉक्युमेंट्री ९० मिनिटांची आहे. याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संगीत आणि नाट्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. अंजली निगवेकर आणि पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले.

पुण्यनगरी

# विद्यापीठात हिंदी दिनानिमित्त आज व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामध्ये हिंदी दिनाचे औचित्य साधून दि. १४ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन केले आहे. नवी दिल्ली येथील भारतीय अनुवाद साहित्य परिषदेचे समन्वयक प्रा. डॉ. अशोककुमार मंगलेश हे 'हिंदी का महत्व एवंम रोजगार के अवसर' या विषयावर ऑनलाईन मार्गदर्शन करणार आहेत. अध्यक्षस्थानी संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे असणार आहेत.

लोकमत

# हिंदी दिनानिमित्त आज व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्रामध्ये हिंदी दिनाचे औचित्य साधून आज, गुरुवारी सकाळी ११ वाजता ऑनलाइन व्याख्यानाचे आयोजन केले आहे. नवी दिल्ली येथील भारतीय अनुवाद साहित्य परिषदेचे समन्वयक प्रा. डॉ. अशोक कुमार मंगलेश हे 'हिंदी का महत्व एवम् रोजगार के अवसर' या विषयावर ऑनलाइन मार्गदर्शन करणार आहेत. अध्यक्षस्थानी संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे असतील. या व्याख्यानास https://meet.google.com/isc-dwuu-ecm या लिंकवर ऑनलाइन उपस्थित राहावे.

सकाळ

- व्याख्यान : मुंबई डबेवाला संघटनेचे अध्यक्ष रघुनाथ मेडगे यांचे व्याख्यान. स्थळ : शिवाजी विद्यापीठ मानव्यविद्या सभागृह. वेळ : सकाळी अकरा
- व्याख्यान : हिंदी दिनाचे औचित्य साधून भारतीय अनुवाद साहित्य परिषदेचे समन्वयक प्रा. डॉ. अशोक कुमार मंगलेश यांचे ऑनलाईन व्याख्यान, स्थळ : शिवाजी विद्यापीठ. वेळ : सकाळी अकरा

तरुण भारत

# दूरशिक्षण केंद्रात आज व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामध्ये हिंदी दिनाचे औचित्य साधून दि. १४ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वा. ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन केलेले आहे. नवी दिल्ली येथील भारतीय अनुवाद साहित्य परिषदेचे समन्वयक प्रा. डॉ. अशोक कुमार मंगलेश हे 'हिंदी का महत्व एवंम रोजगार के अवसर' या विषयावर ऑनलाईन मार्गदर्शन करणार आहेत. अध्यक्षस्थानी संचालक प्रा.डॉ.डी.के.मोरे असणार आहेत.

पुण्यनगरी

# विद्यापीठात व्याख्यानमालेचे आयोजन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आणि सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने प्रभाकरपंत कोरगावकर व्याख्यानमालेचे आयोजन विद्यापीठातील मानव्यशास्त्र सभागृहात करण्यात आले आहे. शनिवार, दि. १६ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता हे व्याख्यान होणार असून, 'महाराष्ट्रातील समाजजीवन व परिवर्तन' या विषयावर मराठी विभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे हे प्रमुख व्याख्याते म्हणून मांडणी करणार आहेत, तर अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के भूषविणार आहेत. याप्रसंगी कोरगावकर ट्रस्टच्या पल्लवी कोरगावकर व सुचिता कोरगावकर यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे, अशी माहिती सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राचे संचालक प्रा. एस. एस. महाजन व विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली आहे.

पुण्यनगरी

# सायबर गुन्ह्यांबाबत शनिवारी व्याख्यान

कोल्हापूर : सायबर गुन्ह्यांतील फसवणुकीपासून सावधानता कशी बाळगावी, याचे मार्गदर्शन व चर्चासत्र होणार आहे. शनिवार, दि. १६ सप्टेंबर रोजी दुपारी ३.३० वाजता शिवाजी विद्यापीठातील वि. स. खांडेकर भाषा भवन येथे कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज व विधी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने हे चर्चासत्र आयोजित केले असल्याची माहिती चेंबरचे अध्यक्ष संजय शेटे यांनी दिली.

लोकमत

# व्यवस्थापनाचे धडे मेडगे आज देणार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट विभागातर्फे आज गुरुवारी 'इंडक्शन प्रोग्रॅम'चे होत आहे. या कार्यक्रमात मुंबई डबेवाला संघटनेचे अध्यक्ष रघुनाथ मेडगे यांचे व्याख्यान होणार आहे. मानव्यविद्या सभागृहात सकाळी ११ वाजता हा कार्यक्रम होणार असून मानव्यविद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. एस. देशमुख हे अध्यक्षस्थानी असतील. या कार्यक्रमाचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंटचे प्र- संचालक डॉ. नितीन माळी यांनी केले.

लोकमत

# ज्योती खराडे यांना पी.एचडी.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या गणितशास्त्र विभागातील सहायक प्राध्यापिका ज्योती प्रमोद खराडे यांनी गणित विषयातून शिवाजी विद्यापीठाची पी.एचडी. मिळवली. 'ॲनालिसिस ऑफ फ्रॅक्शनल डिफरेंशियल इक्वेशन्स इनव्हॉलिव्हिंग जनरलाइज्ड हिल्फर फ्रॅक्शनल डेरिव्हेटिव्ह' या विषयावर त्यांनी शोधप्रबंध सादर केला होता.